Pune Police

## ०५ वर्षापासून फरार असलेल्या घरफोडीतील गुन्हेगार अटक

लोकसभा निवडणूक २०१९ चे अनुशंगाने गुन्हे शाखा, गुन्हे कार्यप्रणाली यादीतील पाहिजे व फरारी असलेले आरोपी यांना शोध घेणेबाबत आदेशीत केलेले आहे. त्या अनुशंगाने गुन्हे शाखा गुन्हे कार्यप्रणालीमधील पाहिजे आरोपीचा शोध युनिट ०४ च्या पथकाकडून घेण्यात येत होता. नमुद शाखेतील पो ना रमेश चौधर, निलेश शिवतरे यास माहिती मिळाली की, कोथरुड पोलीस ठाणे गुरनं ०९/१४ भादवि क ४५४,४५७,३८० मध्ये काही गुन्हेगार हे गुन्हा घडल्यापासून फरार आहे त्यातील आरोपी नामे झाकीर बाबुमिया सय्यद हा येरवडा परिसरात फिरत असून, दि.२७/०३/१९ रोजी येरवडा येथे त्याचे मित्रांना भेटण्याकरता येणार आहे. त्यावरुन सपोफौ सय्यद यांचेसोबात पोलीस कर्मचारी यशवंत बोराडे, सागर घोरपडे, सतिश वणवे यांचे पथक तयार करुन त्याठिकाणी सापळा रचून त्यास पकडण्यात आले. त्यास चौकशीमध्ये त्याने त्याचा सध्याचा राहण्याचा पत्ता शिवनेरी नगर, गल्ली नं १२, वखार जवळ, कोंढवा,पुणे असे असल्याचे सांगितले. त्याचे आणखी साथीदार असून ते सुध्दा गुन्हे कार्यप्रणाली पाहिजे आरोपी लिस्टमध्ये समाविष्ट आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. आरोपी यास पुढील कारवाईकरता कोथरुड पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आले आहे.

दि.२८/०३/२०१९

(अंजुम बागवान)
पोलीस निरीक्षक
युनिट ४,गुन्हे शाखा,पुणे शहर